अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

स्वायत्त

## मराठी विभाग

वर्ग - एफ.वाय.बी.ए. (प्रथम वर्ष कला)

विषय - आधुनिक मराठी साहित्य व व्यावहारिक मराठी

विषय कोड - MAR1101

सत्र - १

## प्रश्नसंच

---

**प्र.१वा) वस्तुनिष्ठ प्रश्न.**

१. 'बिनचेहऱ्याची संध्याकाळ' ही कथा कोणी लिहिली?

अ) गंगाधर गाडगीळ ब) जी.ए.कुलकर्णी क) गौरी देशपांडे ड) जयंत देशपांडे

२. खालीलपैकी कोणता कथेचा प्रकार नाही?

अ) प्राणीकथा ब) परीकथा क) जातक कथा ड) वारी कथा

३. मराठी लघुकथेचे जनक कोणास म्हटले जाते?

अ) श्री. म. माटे ब) गंगाधर गाडगीळ क) प्रा. ना. सि. फडके ड) प्रभा गणोरकर

४. राम गणेश गडकरी यांनी कोणत्या टोपण नावाने विनोदी लेखन केले?

अ) कवी गोविंद ब) बाळकराम क) केशवसुत ड) कवी यशवंत

५. 'सुधारक' हे वृत्तपत्र कोणी सुरू केले?

अ) लोकमान्य टिळक ब) भाऊ पाध्ये क) गोपाळ गणेश आगरकर ड) विष्णुशास्त्री चिपळूणकर

६. मराठीतील पहिले नियतकालिक कोणते?

अ) मराठी साहित्य पत्रिका ब) केसरी क) मराठा ड) दर्पण

७. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण'ची सुरूवात कधी केली?

अ) ६ जानेवारी १८३२ ब) १ मार्च १८२२ क) १५ ऑगस्ट १८१८ ड) यापैकी कोणतेही नाही

८. भारतीय स्वातंत्र्यलढयात खालीलपैकी कोणत्या वृत्तपत्रांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरलेली आहे?

अ) नवाकाळ व संचार ब) महानगर व संदेश क) केसरी व मराठा ड) लोकमत व सामना

९. खालीलपैकी कोणता कथासंग्रह शंकर पाटील यांनी लिहिलेला नाही?

अ) वळीव ब) भेटीसाठी क) धिंड ड) हसवणूक

१०. द. मा. मिरासदार यांची झोप ही कथा त्यांच्या कोणत्या कथासंग्रहातून घेतलेली आहे?

अ) माझ्या बापाची पेंड ब) गप्पागोष्टी क) माकडमेवा ड) भुताचा जन्म

११. ‘नागू गवळी’ याला खालीलपैकी कोणता छंद नव्हता?

अ) कुस्ती करणे ब) व्यायाम करणे क) झोप घेणे ड) गप्पा मारणे

१२. ‘बाई, मी भोळी’ असा आव आणत सरांना कोणी घोळात घेतले होते?

अ) प्रतिक्षा लोणकर ब) प्रतिभा भोळे क) प्रभावती राणे ड) प्रतिभा कुलकर्णी

१३. कोल्हापूरच्या छत्रपती शाहूमहाराज वक्तृत्व स्पर्धेसाठी लेखकाने कोणता विषय निवडला?

अ) ‘वृक्षवल्ली आम्हा....’ ब) ‘स्वातंत्र्यानंतरची वर्षे’

क) विनोदाचं जीवनातील स्थान ड) शाहु महाराजांचे सामाजिक कार्य

१४. मेंगाळे काकुंच्या शेजारी कोण राहत होते?

अ) मास्तरीण बाई ब) देसाई बाई क) वकिलीण बाई ड) भाजीवाली बाई

१५. निवडणूक कार्डावर मेंगाळे काकुंचे वय किती छापले गेले होते?

अ) एक्क्यान्नव ब) एक्कावन्न क) एकशे एक ड) शंभर

१६. सुबरावचा बंडा कोणत्या वर्गात शिकत असतो?

अ) सहावी ब) सातवी क) आठवी ड) नववी

१७. सुबरावचा बंडा आठवीच्या वर्गात किती वेळा नापास होतो?

अ) दोनदा ब) तीनदा क) चारदा ड) यापैकी नाही

१८. केसोपंत कावळे यांच्या मुलीचे नाव काय होते?

अ) कु. अंबूताई ब) कु. कावेरी क) कु. गंगु ड) कु. यमुना

१९. पहिले कावळे संमेलन पुण्यात कुठे घेण्यात आले?

अ) कोष्टी गल्ली ब) पेशवा गल्ली क) तांबट गल्ली ड) तपकीर गल्ली

२०. ट्रंकेच्या चाव्या कुठे असतात?

अ) स्वंयपाक घरात ब) नागूच्या बायकोकडे क) नागूच्या उश्याला ड) नागूच्या कमरेला

२१. ‘आकाशवाणी’ला पर्यायी शब्द कोणता आहे?

अ) देववाणी ब) आकाशाची वाणी क) नभोवाणी ड) कल्याणवाणी

२२. ‘आकाशवाणी’चे ध्येय वाक्य कोणते आहे?

अ) ‘खल निग्रहणाय .....’ ब) ‘बहुजन हिताय बहुजन सुखाय’ क) ‘सर्वांचे मंगल भवः’

ड) ‘एक सत् विप्रा बहुधा वदन्ती।’

२३. ‘रेडिओ’चा शोध पुढीलपैकी कोणत्या शास्त्रज्ञाने लावला?

अ) मार्कोनी ब) ॲरिस्टॉटल क) जयंत नारळीकर ड) माशेलकर

२४. मराठीतील पहिले वर्तमानपत्र कोणी सुरू केले?

अ) बाळ गंगाधर टिळक ब) गोपाळ गणेश आगरकर क) विष्णुशास्त्री चिपळूणकर ड) यापैकी नाही

२५. मराठीतील पहिले वर्तमानपत्र कोणते?

अ) विविध ज्ञान विस्तार ब) ज्ञानदीप क) सुधारक ड) दर्पण

२६. दूरदर्शन कोणत्या प्रसारमाध्यमात मोडते?

अ) दृश्य ब) श्रवण क) दृकश्राव्य ड) दूरून दर्शन

२७. खालीलपैकी कोणती मराठी वाहिनी नाही?

अ) ए.बी.पी. माझा ब) सहयाद्री क) स्टार प्रवाह ड) प्रजासत्ताक

२८. वर्तमानपत्रास कोण बातमी मिळवून देतो?

अ) संपादक ब) सहसंपादक क) टंकलेखक ड) बातमीदार

२९. खालीलपैकी कोणते वर्तमानपत्र मराठी नाही?

अ) दै. सकाळ ब) दै. नवाकाळ क) दै. सामना ड) दै. भास्कर

३०. खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता ते लिहा.

अ) दैनिक ब) साप्ताहिक क) पाक्षिक ड) अनुष्ठुभ

**प्र.२) पुढील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

१. कथचा प्रारंभ कधी झाला ?

२. कथेची कोणतीही एक व्याख्या लिहा.

३. मराठीतील कोणत्याही चार लघुकथाकारांची नावे लिहा.

४. कथा आणि कादंबरी यांच्यातील कोणताही एक फरक लिहा.

५. कथानक म्हणजे काय?

६. कथेचे कोणतेही चार घटक लिहा.

७. पहिल्या कावळे संमेलनात किती सदस्य उपस्थित होते?

८. पहिले कावळे संमेलन कोणी भरविले?

९. पहिल्या कावळे संमेलनाचे अध्यक्ष कोण होते?

१०. 'कावळे वाडयाचे' मालक कोण होते?

११. 'बंडयाचा बाप' कोणती तक्रार घेऊन मास्तरांकडे येतो?

१२. सुबरावचा मुलगा कोणत्या कामात हुशार असतो?

१३. सुबराव मास्तरांची तक्रार कोणाकडे करतो?

१४. नागू गवळयाचा हातखंडा विषय कोणता होता?

१५. नागू गवळयाच्या म्हशीचे नाव काय होते?

१६. मुकुंद टाकसाळे यांना कोणासारखे वक्ता व्हायचे असते?

१७. कु. प्रतिभा भोळे हिच्या वक्तृत्त्वाचा विषय कोणता होता?

१८. लेखक प्रा. कुलकर्णी यांच्याशी वाद का घालतो?

१९. 'पेज थ्री' ही कथा कोणी लिहिलेली आहे?

२०. मेंगाळे काकुंच्या मनात कोणत्या वाक्याने मत्सराची ठिणगी पडते?

२१. शंकर पाटील यांच्या कोणत्याही दोन कथा संग्रहाची नावे लिहा.

२२. 'नवयुग' साप्ताहिक कोणी सुरू केले?

२३. 'हशा आणि टाळया' हा विनोदी लेखसंग्रह कोणी लिहिलेला आहे?

२४. 'तक्रार' ही शंकर पाटलांची कथा कोणत्या कथासंग्रहातून घेतलेली आहे?

२५. 'पेज थ्री' म्हणजे काय?

**प्र.३) टीपा दया.**

१. 'कथा वाङ्.मय प्रकार' चर्चा करा.

२. 'लघुकथा' संकल्पना स्पष्ट करा.

३. 'केसोपंत कावळे' व्यक्तीत्त्व.

४. भगिनी संमेलनातील ठराव

५. 'तक्रार' कथेतील 'सुबराव'

६. 'झोप' कथेतील 'नागू गवळी'

७. 'मी आचार्य अत्रे कसा झालो नाही?' या कथेतील कु. प्रतिमा भोळे

**प्र.४) लघुत्तरी प्रश्न.**

१. कथा व कादंबरीतील फरक थोडक्यात सांगा.

२. कथेच्या कोणत्याही दोन घटकांची सविस्तर माहिती लिहा.

३. व्यक्तिचित्रण आणि वातावरण या कथेच्या दोन घटकांची चर्चा करा.

४. कथानक आणि निवेदन या कथेच्या दोन घटकांविषयी सविस्तर चर्चा करा.

५. केसोपंत कावळे यांनी घराण्याचा इतिहास कशा स्वरूपात लिहिला?

६. सुबरावच्या अडाणीपणातही एक शहाणपण होते, कसे ते लिहा.

७. मुकुंद टाकसाळे यांची कोल्हापूरला वक्तृत्व स्पर्धेत कशी फजिती होते?

८. मुकुंद टाकसाळे वक्तृत्व स्पर्धेची कशी तयारी करतात?

९. मेंगाळे काकू आणि वकिलीनबाई यांच्यात कोणकोणत्या प्रकारची स्पर्धा असते?

१०. पाहिल्या कावळे संमेलनात कोणकोणते ठराव मांडले गेले ते लिहा.

११. कथेची उत्पती थोडक्यात लिहा.

१२. नागू गवळी यांचा दिनक्रम लिहा.

**प्र.५) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. मराठी कथेची जडणघडण आणि विकास कसा झाला, याची सविस्तर चर्चा करा.

२. कावळे संमेलनाच्या आयोजनाची तयारी कशाप्रकारे केली गेली?

३. सुबरावचा युक्तीवाद कसा बिनतोड असतो, ते लिहा.

४. 'नागू गवळी' याची चोराशी कशी झटापट होते, ते साधार लिहा.

५. 'मेंगाळे काकू' वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर कशा प्रकारे झळकतात, ते सविस्तर लिहा.

६. वक्तृत्व कथेला 'खोडसाळ कला' असे मुकुंद टाकसाळे का संबोधतात ते साधार लिहा.

७. एक मध्यमवर्गीय स्त्रीचे मनोदर्शन 'पेज थ्री' या कथेतून कसे घडते, ते लिहा.

## व्यावहारिक मराठी

**प्र.१ला) पुढील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

१. कोणत्याही चार प्रसार माध्यमांची नावे लिहा.

२. प्रसारमाध्यमे म्हणजे काय?

३. मुलाखतीसाठी कमीतकमी किती व्यक्तींची आवश्यकता असते?

४. 'आकाशवाणी' म्हणजे काय?

५. तुम्ही नियमित वाचत असलेल्या कोणत्याही चार वर्तमानपत्रांची नावे लिहा.

६. 'लोकसत्ता' या वर्तमानपत्राने सध्याचे संपादक कोण आहेत?

७. 'दै. सकाळ' मधील तुम्हाला आवडणाऱ्या कोणत्याही चार सदरांची यांची नावे लिहा.

८. आकाशवाणी व दूरदर्शन यातील फरक सांगा.

९. दूरदर्शनच्या कोणत्याही चार वाहिन्यांची नावे लिहा.

**प्र.२रा) लघुत्तरी प्रश्न.**

१. आकाशवाणी आणि दूरदर्शन या दोन्ही माध्यमांतील कोणतेही दोन फरक लिहा.

२. मुलाखत घेताना मुलाखतकाराने कशा प्रकारे तयारी करावी, ते लिहा.

३. मुलाखतकाराकडे कोणते गुण असावेत?

४. मुलाखतकाराने कोणत्या गोष्टी टाळायला हव्यात ते लिहा.

५. 'दूरदर्शन' हे सर्वात प्रभावी प्रसारमाध्यम आहे, कसे ते लिहा.

**प्र.३रा) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. ‘महिला सबलीकरण’ या विषयावर आकाशवाणीसाठी मुलाखत लेखन करा.

२. ‘प्रौढ शिक्षण’ याविषयी दूरदर्शनवरून मुलाखत प्रसारीत करावयाची आहे, तिचे लेखन करा.

३. कोणत्याही एका प्रसार माध्यमासाठी मुलाखत लेखन करा.

४. ‘सामाजिक वनीकरण’ या विषयावर वनअधिकाऱ्याची मुलाखत लिहा.

५. ‘स्त्री-पुरूष समानता’ या विषयावर वर्तमानपत्रासाठी (विचारवंत विद्या बाळ किंवा उत्तम कांबळे) मुलाखत घ्या.

**प्र.४था) टीपा दया.**

१. नियतकालिके

२. बातमी लेखन

३. जाहिरात लेखन

४. ब्लॉग लेखन

५. सोशल मिडिया

--------------------